श्री.सुभाष कोंडाजी सोनवणे,मुख्याध्यापक, जि.प.प्राथ.शाळा
टाकळी ता.कोपरगाव यांना पदस्थापना देणेबाबत

जिल्हा परिषद अहमदनगर
शिक्षण विभाग (प्राथमिक)
आदेश.क्र.कार्या-२/खाचौ(उ)/२५१९/ ५२४/२०२२
अहमदनगर दि. ३५ / ०९ /२०२२

संदर्भः-१. इकडील कार्यालयाचा सेवा निलंबन आदेश क्र.कार्या-२/खाचौउ/५२७/२०१९ दि.०६/११/२०१९
२. या कार्यालयाकडील दोषारोप ज्ञापन क्र.कार्या-२/खाचौ(उ)/२३३/२०२० दि.१२/०५/२०२०
३. या कार्यालयाकडील चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांचा नियुक्ती आदेश क्र.कार्या-२/खाचौ (उ)/३०६/२०२० दि.१२/०६/२०२०.
४. सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल क्र.विशा.४/ /खाचौ/सी.आर.६६/२०२० दि.२० एप्रिल २०२१
५. या कार्यालयाकडील अंतिम आदेश जा.क्र. कार्या-२/खाचौ(उ)/३३९/२०२१ दि.१३/१०/२०२१
६. मा.अपर आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचेकडील निकाल पत्र दि.१०/०२/२०२२
७. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.अ.नगर यांचेकडील सुनावणी दि.११/०४/२०२२ व दि.२९/०४/२०२२
८.श्री.कासार आर.के.(लेखाधिकारी) सर्व शिक्षा अभियान जि.प.अ.नगर यांचेकडील दि.२५/०७/२०२२ चा चौकशी अहवाल
९.महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४
१०.महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील विभागीय चौकशी नियमपुस्तिका १९९१

श्री.सुभाष कोंडाजी सोनवणे,मुख्याध्यापक जि.प.प्राथ.शाळा टाकळी ता.कोपरगाव येथे कार्यरत असताना त्यांनी शाळेतील विदयार्थ्यांना मारहाण करणे,आत्महत्या करणे संदर्भात प्रसारमाध्यमांना वृत्त देणे,शालेय अभिलेखे अपुर्ण ठेवणे व मुदतबाहय शालेय पोषण आहार शाळेत ठेवणे आदी प्रकरणी गैरवर्तन व अनियमितता केलेली होती सबब श्री.सुभाष कोंडाजी सोनवणे, मुख्याध्यापक यांना दि.०६/११/२०१९ चे आदेशान्वये सेवा निलंबित करणेत येवुन त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करणेसाठी दि.१२/०५/२०२० अन्वये दोषारोप १ ते ४ निश्चित करणेत आलेले होते. सबब श्री.सुभाष कोंडाजी सोनवणे यांचे दोषारोपाची मा. सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचेकडे चौकशी प्रस्तावित केलेली असता मा.सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक यांनी दि.२०/०४/२०२१ अन्वये श्री.सुभाष कोंडाजी सोनवणे यांचे दोषारोपातील शालेय विदयार्थ्यांना मारहाण करणे,शालेय अभिलेखे अपुर्ण ठेवणे हे दोन आरोप अंशतः तर आत्महत्या करणे संदर्भात वृत्त प्रसिध्द करणे,मुदतबाहय आहार ठेवणे हे आरोप पुर्णतःसिध्द होत असलेचा निष्कर्ष सादर केलेला आहे परिणामी दि.१३/१०/२०२१ चे आदेशान्वये श्री.सोनवणे सुभाष कोंडाजी यांना सेवेतून कमी करणे ही शास्ती अंतिम केलेली आहे. परिणामी श्री.सुभाष

कोंडाजी सोनवणे यांनी दि.१३/१०/२०२१ चे शिक्षेचे आदेशाविरुध्द अपर आयुक्त यांचेकडे अपील दाखल केलेले होते.

अपर आयुक्त नाशिक यांनी प्रकरणी दि.१०/०२/२०२२ अन्वये श्री.सोनवणे सुभाष कोंडाजी मुख्याध्यापक यांचे अपिल अशंतः मान्य केलेले असुन शिक्षेचा आदेश रद्द केलेला आहे. तसेच प्रकरणी श्री.सोनवणे सुभाष कोंडाजी यांना म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येऊन दोषसिध्दीचे प्रमाणात फेर आदेश पारित करणेबाबत आदेशित केलेले आहे.

सबब ज्याअर्थी अपर आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांनी श्री.सोनवणे सुभाष कोंडाजी मुख्याध्यापक यांचे अपिल अशंतः मान्य करुन इकडील दि.१३/१०/२०२१ रोजीचा सेवेतुन कमी करणेचा आदेश रद्द केलेला आहे त्याअर्थी श्री.सोनवणे सुभाष कोंडाजी मुख्याध्यापक यांना जि.प.प्रा.शाळा पिंपळगाव निपाणी ता.----------येथे सेवेत मुख्याध्यापक पदावर पदस्थापना देणेत येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री.सुभाष कोंडाजी सोनवणे,मुख्याध्यापक यांच्या मुळ सेवापुस्तकात घेणेबाबत तात्काळ कार्यवाही करावी.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. 202209151601 36 असा आहे.

(आशिष येरेकर भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,
श्री.सुभाष कोंडाजी सोनवणे
मु.पो.----------ता.----------जि.अहमदनगर

प्रत- गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती----------

२/- श्री.सुभाष कोंडाजी सोनवणे यांना आपले अधिनस्त उक्त शाळेवर पदस्थापना देणेत आलेने त्यांना तात्काळ शाळेवर रुजु करुन घेवुन त्यांचे सेवापुस्तकामध्ये सदर आदेशाची नोंद घेवुन पुढील कार्यवाही करावी व सदर कर्मचारी हजर झालेबाबतचा अहवाल इकडे उलटटपाली सादर करावा.

प्रत- गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती ----------

(आशिष येरेकर भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर